**महाराष्ट्र शासन**

**जलसंपदा विभाग**

**जलक्रांतीचे जनक माजी मुख्यमंत्री स्वर्गीय डॉ शंकरराव चव्हाण यांच्या गौरवपूर्ण कार्याच्या स्मरणार्थ 'जलभूषण पुरस्कार' अदा करणेबाबत**

**जाहीर निवेदन**

माजी मुख्यमंत्री स्वर्गीय शंकरराव चव्हाण या थोर पुरुषाच्या गौरवपूर्ण कार्याच्या स्मरणार्थ जलसंपदा, जलसंधारण आणि पाणीपुरवठा क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्ती/ संस्था यांना दरवर्षी जलभूषण पुरस्कार प्रदान करण्याचा शासन निर्णय सीडीए २०२० प्र क्र /१०० लाक्षेवि कामे जलसंपदा विभाग मंत्रालय मुंबई ३२ दिनांक १३.०५.२०२२ अन्वये घेतला आहे. या शासन निर्णयानुसार जलभुषण पुरस्कारासाठी **१ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ या एक वर्षाच्या कालावधीतील केलेल्या कामाबाबत नामांकने ऑनलाईन पद्धतीने सादर करण्यात यावीत.**

अर्ज सादर करण्यासाठी दिनांक १ जून २०२३ ते दिनांक ३० जून २०२३ या कालावधीत उपलब्ध करून देण्यात येईल. अर्ज भरावयाची लिंक ही दिनांक ३१ मे २०२३ मध्यरात्री नंतरच उपलब्ध असेल. प्रस्तुत ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी आवश्यक लिंक तसेच सविस्तर कार्यक्रम व इतर आवश्यक सुचना https://wrd.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील.

**(बा.ज.गाडे)**
अधीक्षक अभियंता व संचालक
पाटबंधारे संशोधनव विकास संचालनालय
पुणे